दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१७/२०१७-१८
दि.१६/०२/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.विनोद दामोदर शेवंते, ................अपिलार्थी
बी-४०१, रितु ग्लोरियस बिल्डींग,
आयडीयल पार्क, ऑरेंज हॉस्पिटल जवळ,
मिरारोड (पूर्व), ४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.विनोद दामोदर शेवंते यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२६/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्यक (लि) आरोग्य विभाग, ठाणे जिल्हा परिषद यांनी पाठवलेले पत्र व त्यासोबत जोडलेला सर्व पत्राची सत्यप्रत द्या.
२) मनपा/साप्र/२१६६/दि.२०१५-१६ दिनांक २१/०३/२०१६ च्या दाखल्याची सत्यप्रत द्या
३) सचिन चवाथे यांच्या बडतर्फी बाबत आजपर्यंत काय कार्यवाही केली त्याची सर्व कागदपत्रे सत्यप्रत करुन द्या.
४) स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्य (लि) आरोग्य विभाग, ठाणे जिल्हा परिषद यांनी पाठवलेले पत्र व त्या सोबत जोडलेला दाखला सत्य आहे कि असत्य त्याची माहिती द्या.
५) असत्य असल्यास मिरा भाईंदर महापालिकेचे लेटर पॅड वापरुन बोगस सेवा दाखला बनवला असल्यास सदर दाखल्या बनवुन महानगरपालिकेची फसवणूक केली म्हणून सौ.चवाथे व सचिन चवाथे यांच्यावर गुन्हा नोंद केलेली कागदपत्रे सत्य करुन द्या.
६) वरील स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्यक (लि) आरोग्य विभाग ठाणे जिल्हा परिषद यांनी पाठवलेले पत्र व पत्राला पाठवलेल्या उत्तराची सत्यप्रत करुन द्या.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१४/०२/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/२१७/२०१८ दि.०८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी अथा सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग हे रजेवर असल्याकारणाने सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, सामान्य प्रशासन विभाग/जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२६/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला मुद्देनिहाय माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सा.प्र./आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी आपल्या विभागाशी संबंधित मुद्दांची माहिती अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क पुरविण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

22/2/2018 o/c

प्रति:-

१) श्री.विनोद दामोदर शेवंते,
बी-४०१, रितु ग्लोरियस बिल्डींग,
आयडीयल पार्क, ऑरेंज हॉस्पिटल जवळ,
मिरारोड (पूर्व), ४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा - for Akshay 15/02/18
सहा.आयुक्त (सा.प्र.)

३) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

15.2.2018

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.